## Student Adoptive Parents Scheme

1. Encouraging education to destitute, poor and talented students.

2. To inculcate confidence in destitute and economically weak students.

This college is located in rural area where poor & backward class students seek admissions. Some parents lost their lives due to suicide and corona epidemic; so in post endemic period students' attendance failed considerably. It was realized that financial aid may increase students' attendance. The teaching and non-teaching staff raised 'Students Welfare Fund'. 'Students Adoptive Parent Scheme' was framed and students were informed about the rules and regulations of the scheme. Students' applications were invited; then scrutinized and finally applicants were interviewed. Subsequently financial assistance was paid for purchase of Bus Passes, Study Material, Uniforms, and School Bags.

The student beneficiaries under 'Students Adoptive Parent Scheme' were: Ku. Achal S. Badvaik (B.A. I), Ku. Pratiksha P. Thool (B.A. II), Ku. Monika V. Upate (B.A. II), Ku. Jaishree G. Chaudhari (B.A. II) were paid Rs. 3000/- for purchase of Bus Passes, Study Material, Uniforms, and School Bags at the hands of Principal & Vice Principal of the college on the occasion of Birth Anniversary of Savitrbai Fule: 3rd January 2022.

नेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था, हिंगणघाट द्वारा संचालित

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित

# श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय

## वडणेर. ता. हिंगणघाट, जि- वर्धा.

**स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सव निमित्त**

**' विद्यार्थी दत्तक पालक योजनेचा शुभारंभ सत्र 2021 – 2022 '**

---

श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय वडणेर. ता. हिंगणघाट, जि- वर्धा. वर्ष 2021 – 2022 या सत्रात बी. ए. भाग 1, 2 & 3 चे प्रवेशीत विद्यार्थी जर आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील असेल व कौटुंबिक आधार नसेल अशा गरीब, होतकरू व निराधार पात्र चार विद्यार्थ्यांसाठी असलेल्या या योजनेद्वारे विद्यार्थ्यांना निकषानुसार गणवेश, बॅग, शालेय वस्तु, बस – पास इत्यादीसाठी महाविद्यालयीन विद्यार्थी कल्याण निधी च्या माध्यमातून आर्थिक मदत केली जाते. याबाबतचा अंतिम निर्णय प्राचार्यांचा राहील.

विद्यार्थ्यांना आवश्यक कागद पत्रासह प्राचार्य, श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय वडणेर. ता. हिंगणघाट, जि- वर्धा. यांच्याकडे अर्ज सोमवार, दिनांक 25 ऑक्टोबर 2021 पर्यंत विद्यार्थ्यांनी खालील दिलेल्या सर्व कागदपत्रासह स्वत: सादर करावा. (अर्जामध्ये राहत्या घराचा संपूर्ण पत्ता व मोबोईल नंबर लिहावा.) आलेल्या संपूर्ण अर्जाची संपूर्ण पडताळणी, मूल्यमापन व प्रत्यक्ष चौकशी केल्यानंतर निकषानुसार सहा पात्र विद्यार्थ्यांची निवड यादी प्रकाशित केल्या जाईल. अश्या सहा विद्यार्थ्यांना 2021 -2022 या सत्रामध्ये 'विद्यार्थी दत्तक पालक योजनेचा' लाभ दिला जाईल.

**- विद्यार्थी दत्तक पालक योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे -**

1) सुवाच्य अक्षरात अर्ज व त्यावर एक पासपोर्ट फोटो चिकटावा.
2) महाविद्यालयीन ओळखपत्र व अॅडमिशन पावतीची एक - एक झेरॉक्स प्रत जोडावी.
3) वर्ष 2020 - 2021 मधील उत्पन्नाचा दाखल्याची एक झेरॉक्स प्रत जोडावी.
4) आई किंवा वडील यापैकी कुणीही एक किंवा दोघेही हयात नसल्यास (मृत्यू झाल्यास) त्यांच्या मृत्युच्या प्रमाणपत्राची एक - एक झेरॉक्स प्रत जोडावी.
5) आधार कार्ड व रेशन कार्ड ची एक - एक झेरॉक्स प्रत जोडावी.
6) बी. ए. भाग 1 साठी वर्ग 10 वी व वर्ग 12 वी च्या गुणपत्रिकेची एक - एक झेरॉक्स प्रत जोडावी.
7 ) बी. ए. भाग 2 साठी वर्ग 10 , 12 व बी. ए. भाग 1 च्या गुणपत्रिकेची एक - एक झेरॉक्स प्रत.
8) बी. ए. भाग 3 साठी वर्ग 10, 12 , बी. ए. भाग 1 & 2 च्या गुणपत्रिकेची एक - एक झेरॉक्स प्रत.

दिनांक : 01 ऑक्टोबर 2021

———— संपर्क ————

**-: विद्यार्थी दत्तक पालक योजना समिती :-**

| डॉ. सारिका चौधरी | डॉ. विनोद मुडे | डॉ. नरेश भोयर | डॉ. उत्तम पारेकर |
|---|---|---|---|
| उपप्राचार्य / समन्वयक | अध्यक्ष | सचिव | प्राचार्य |

वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था, हिंगणघाट द्वारा संचालित
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित
श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडणेर
सत्र 2021 -2022 करिता 'विद्यार्थी दत्तक पालक योजना'

## अहवाल

### 'विद्यार्थी दत्तक पालक योजना – साहित्य वाटप कार्यक्रम

श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय वडणेर, ता. हिंगणघाट, जि- वर्धा, वर्ष 2021 – 2022 या सत्रापासून बी. ए. भाग 1, 2 & 3 चे प्रवेशीत विद्यार्थी जर आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील असेल व त्यांना कौटुंबिक आधार नसेल अशा गरीब, होतकरू व निराधार पात्र विद्यार्थ्यांसाठी असलेल्या या योजनेद्वारे विद्यार्थ्यांना समितीच्या निकषानुसार महाविद्यालयीन गणवेश, शालेय वस्तु, बस – पास इत्यादींसाठी महाविद्यालयीन विद्यार्थी कल्याण निधीच्या माध्यमातून आर्थिक मदत केली जाते.



सोमवार दिनांक 03 जानेवारी 2022 ला सकाळी 10.00 वाजता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त कार्यक्रम प्रसंगी कु. आचल बडवाईक, कु. प्रतिक्षा धूल, कु मोनिका उपाते, कु. जयश्री चौधरी यांना गणवेश, बॅग,



1

शालेय साहित्य (एकून किंमत रुपये 1650/- ) व बस पास इत्यादीसाठी (नगदी रुपये 1350/- ) इत्यादी 'विद्यार्थी दत्तक पालक योजने' अंतर्गत 'विद्यार्थी दत्तक पालक योजने' अंतर्गत लाभ देण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य उत्तम पारेकर, प्रमुख अतिथि डॉ. गणेश बहादे, समितीच्या समन्वयक व उपप्राचार्य डॉ. सारिका चौधरी, समितीचे अध्यक्ष डॉ. विनोद मुडे, सचिव डॉ. नरेश भोयर, यांचा प्रमुख उपस्थितीत सात - पात्र विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन गणवेश, शालेय साहित्य व आर्थिक मदतीचे वाटप करण्यात आले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक डॉ. सारिका चौधरी यांनी, कार्यक्रमाचे संचालन समितीचे अध्यक्ष डॉ. विनोद मुडे यांनी तर आभार प्रदर्शन समितीचे सचिव डॉ. नरेश भोयर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. विठ्ठल घिनमिने, डॉ. पंकज मुन, प्रा. आरती देशमुख, डॉ. नितेश तेलहांडे, डॉ. संजय दिवेकर, श्री. नरेश कातडे, शंकर कापसे, संजय पर्बत, कु. प्रिती सायंकार यांनी विशेष मदत व सहकार्य केले .

# महाविद्यालयीन विद्यार्थी कल्याण निधीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आर्थिक मदत

## विद्यार्थ्यांना गणवेश, शालेय साहित्य भेट व बस – पास यासाठी आर्थिक मदत



**राहुल दुरतकर, तालुका प्रतिनिधी हिंगणघाट**

**वडणेर :** स्थानिक वडणेर येथील श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालयात मागच्या वर्षीपासून बी. ए. पदवी मधील प्रवेशीत विद्यार्थी जर आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील असेल व त्यांना कौटुंबिक आधार नसेल अशा गरीब, होतकरू व निराधार पात्र विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयीन विद्यार्थी कल्याण निधीच्या माध्यमातून 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले विद्यार्थी दत्तक पालक योजना' या नावाने ही योजना सुरू केली गरीब, होतकरू विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाने सामाजिक बांधिलकीतून सुरू केलेली योजना म्हणजे गरीब विद्यार्थ्यांना संजीवनी ठरेल व ते कठीण परिस्थितीवर मात करून निश्चितच यशाचे उंच शिखर गाठेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला तसेच कोठेच आधार नसलेल्या मुला-मुलींच्या उच्च शिक्षणाच्या स्वप्नाची पूर्तता करण्यासाठी दानशुरांनी आर्थिक मदतही करण्याचे आवाहन व ही योजना महाविद्यालयाने सुरू केल्याबाबत सर्वांचे अभिनंदन त्यांनी केले.